# प्राजक्ता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सुरक्षा मार्गदर्शन



**पब्लिक पोस्ट प्रतिनिधी**

**अकोला, ता.१५** : प्राजक्ता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथेसायबर सुरक्षा बाबत मार्गदर्शन संपन्न झाले यामध्ये सायबर क्राईम आणि त्याचे प्रकार, सोशल मिडीयाच्या माध्यमातून ऑनलाईन गुन्हे कसे घडतात, इंटरनेट आणि मोबाईलच्या माध्यमातून होणारे फ्रॉड्स, तसेच अशी ऑनलाइन फसवणूक होऊ नये, यसाठी कोणती काळजी घ्यावी याविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला यांच्या सहकार्याने व क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने घेण्यात आले. कार्यक्रम प्राचार्य सागर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वनिता सावरकर प्रमुख अतिथी म्हणून पडवाल सर उपस्थित होते. सायबर वॉरियर्स शितल फंदाट, वैभवी गंगावते यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण खैरे व आभार प्रदर्शन सीमा पवार यांनी केले. या कार्यशाळेला मीनाक्षी देशमुख, स्वप्नगंधा जगताप, शैलजा डाबेराव, सोळंके उपस्थित होत्या. या कार्यक्रमास वर्ग पाचवी ते दहावीचे विद्यार्थी उपस्थित होते, आदी उपस्थित होते.

Akola Edition
17 October 2023 Page No. 4
epaper.matrubhumi.com